Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ४७ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.७ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ओबीसी समाजाने जमेल त्या मार्गाने विरोध करावा

## मागील दाराने ओबीसींमध्ये प्रवेश ;सरकारच्या धोरणांवर छगन भुजबळ यांचा आक्षेप

**जालना । प्रतिनिधी**

मराठा समाजास सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देणे म्हणजे मागील दाराने ओबीसीमध्ये प्रवेश देण्यासारखे आहे, अशी टीका राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी केली. बीडमध्ये मराठा आंदोलकांनी लक्ष्य केलेल्या आमदारांच्या घरांची त्यांनी सोमवारी पाहणी केली. या वेळी त्यांनी आपल्याच सरकारच्या अनेक धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी फाटय़ाजवळ पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना भुजबळ यांनी सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देऊन मराठा समाजास आरक्षण देण्यास विरोध असल्याचे स्पष्ट केले. निजामकालीन कुणबी नोंदी असलेल्यांना आरक्षण द्यायला हरकत असेही ते म्हणाले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे भुजबळांनी सरकारच्या धोरणांवरच तोफ डागली. तेलंगणामध्ये निवडणूक सुरू असताना दोन दिवसांत कुणबी असल्याचे पुरावे कसे मिळतात, असा प्रश्न त्यांनी केला. ज्या जालना जिल्ह्यातून शरद पवारांनी ओबीसी आरक्षणाची घोषणा केली तेथूनच आरक्षण संपवण्याचे काम सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला.बीडमध्ये माध्यमांशी संवाद साधताना भुजबळ म्हणाले, की सोळंकेंच्या घराची जाळपोळ पाहून आपण बीडच्या पोलीस अधीक्षकांशी बोललो आणि त्यांना राऊत यांच्या हॉटेलला बंदोबस्त देण्याच्या सूचना केल्या. मात्र, बीडचे पोलीस गाफील राहिले. समाजकंटकांनी हिंसाचार करायचा आणि सरकारने गुन्हे मागे घ्यायचे यावर नक्कीच विचार करावा लागेल, असा सल्लाही त्यांनी सरकारला दिला. घटनेच्या मुळाशी गेले पाहिजे, त्यामागे नेमके कोण होते याचा शोध घेऊन शिक्षा व्हायला पाहिजे, अशी मागणीही भुजबळ यांनी केली.



**‘गुन्हे मागे घेऊ नका’**

बीड जिल्ह्यात मराठा नेत्यांच्या घरांवरील हल्ले पूर्वनियोजित असून, त्याची गुप्तचर विभागाला माहिती कशी नव्हती, अशी शंका भुजबळ यांनी उपस्थित केली. कुणाला जिवे मारायचे होते का? राज्य सरकारने ठाम भूमिका घ्यावी व गुन्हे मागे घेऊन नयेत, अशी मागणी त्यांनी केली. आंतरवाली सराटी येथे पोलिसांवर झालेल्या हल्ल्याचीही चौकशी केली जावी, असेही भुजबळ या वेळी म्हणाले.

## तळेगावात निकाल ऐकायला आलेल्यांवर काळाचा घाला

**वर्धा । प्रतिनिधी**

सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीचा निकाल ऐकण्यासाठी आलेल्यांवर काळाने झडप घातली. आष्टी येथून गावाला परत जात असताना आष्टी ते मोर्शी मार्गावर होले नर्सरी जवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली.उपचारासाठी नेत असताना रामहरी उंबरकर (६०) रा. जोळवाडी, हबीब शाह (५५) रा. लहान आर्वी या दोघांचा मृत्यू झाला तर तीन जण किरकोळ जखमी झाले. ही घटना ६ नोव्हेंबर सोमवार रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास घडली.

आष्टी येथून ग्रामपंचायतचा निकाल ऐकून लहान आर्वी येथे कैलास भुसकडे (४५) हे एम. एच. ३२ ए. यु. ७१०५ क्रमांकाचया दुचाकीने जात होते. आयटीआय जवळ त्यांना हबीब शाह अब्दुल शाह यांनी हात दिला आणि दुचाकीवर बसून लहान आर्वीकडे जाण्यासाठी



निघाले. दरम्यान, रामहरी उंबरकर मु. जोळवाडी हे एम. एच. ३२ ए. व्ही. ३२०९ क्रमांकाच्या दुचाकीने ट्रिपल सीट भरधाव जोलवाडी गावाच्या दिशेने जात असताना त्यांची दुचाकी समोरच्या दुचाकीवर जाऊन आदळली. यात रामहरी उंबरकर हे गंभीर जखमी झाले.सोबतच दुसर्या दुचाकीवरील हबीब शाह अब्दुल शाह हे जमिनीवर पडल्यामुळे तेही गंभीर जखमी झाले. तर कैलास भुसकडे, सूर्यभान रामाजी टेकाम आणि उत्तम जानराव नेहारे हे किरकोळ जखमी झाले. जखमींना आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. रामहरी उंबरकर, हबीब शाह यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना नागपूरला हलविण्यात आले. मात्र, वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. पुढील तपास पोलीस करीत आहे .

## गोंदिया विमानतळावर खासदार सुनील मेंढे यांनी केले पंतप्रधान मोदींचे स्वागत

**गोंदिया । प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खासदार सुनील मेंढे यांनी गोंदिया येथील बिरसी विमानतळावर स्वागत केले.

मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रचार सभेला संबोधित करण्यासाठी मध्य प्रदेशात जात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी गोंदिया विमानतळावर दाखल झाले. यावेळी पंतप्रधानांचे खासदार सुनील मेंढे यांनी स्वागत केले. यानंतर पंतप्रधान पुढील प्रवासासाठी निघून गेले.यावेळी स्वागतासाठी खासदार प्रफुल्ल पटेल, संपर्क प्रमुख बाळाभाऊ अंजनकर, भाजप जिल्हाध्यक्ष येशुपाल उपराडे, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, आमदार विनोद अग्रवाल, आमदार विजय रहांगडाले,




गोपाल अग्रवाल, संजय पुराम अन्य मान्यवर उपस्थित होते. पंतप्रधानांचे आपल्या लोकसभा मतदारसंघात स्वागत करण्यात आलेला योग एक आनंदाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया खासदार सुनील मेंढे यांनी यानंतर दिली..

## ग्रा.पं.निवडणुकीत जिल्ह्यात काँग्रेस आघाडीवर ठाकरे गट २ तर भाजप एका जागेवर विजयी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात ८ सार्वत्रिक तर ५८ ग्राम पंचायतीमध्ये पोटनिवडणूक पार पडली. ६ नोव्हेंबर रोज सोमवार ला मतमोजणीत आलेल्या निकालात काँग्रेसने ३, भाजप १, शिवसेना (ठाकरे गट) २ तर २ ग्राम पंचायतीमध्ये स्थानिक पॅनलने वर्चस्व प्रस्थापित केले.

चंद्रपूर जिल्ह्यात ५ नोव्हेंबरला ८ ग्राम पंचायतीमध्ये सार्वत्रिक निवडणूक पार पडली. यामध्ये राजूरा तालुक्यात सर्वात जास्त ३ ग्रामपंचायत, वरोरा येथे २, ब्रम्हपूरी १, सावली १, जिवती १ ग्राम पंचायतीचा समावेश होता.५ नोव्हेंबर ला सकाळी दहा वाजता पासून मतमोजणी करण्यात आली. हाती आलेल्या निकालामध्ये काँग्रेसने ८ पैकी राजूरा तालुक्यातील आर्वी, सावली तालुक्यातील मोखाडा तर वरोरा तालुक्यातील सालोरी या तीन ग्रापनचायात मध्ये सरपंच पदावर विजय मिळविला आहे. आर्वीमध्ये सरपंचासह ९ जागा तर सावलीतील मोखाडा येथे सरपंचासह ८ जागावर विजय मिळविला. आर्वीमध्ये सुरज माथनकर, मोखाडा मध्ये प्रणिता मशाखेत्री, तर सालोरी मध्ये प्रतिभा शेरकुरे सरपंच पदावर विजयी झाल्या. काँग्रेस पाठोपाठ दोन ग्राम



पंचायतीमध्ये शिवसेना (ठाकरे गट) ची जादू चालली. राजुरा तालुक्यातील आर्वीमध्ये सरपंचासह ११ जागावर शेतकरी संघटना व शिवसेना(ठाकरे गट) युतीने विजय मिळविला. यामध्ये सेनेच्या निकीता झाडे सरपंचपदावर विजयी झाल्या.वरोरा तालुक्यातील अर्जूनी येथे शिवसेना( उ.बा.ठा) सोनू विकास हनवते सरपंच पदावर तसेच ७ ग्रामपंचायत सदस्य विजयी झाले. राजूरा तालुक्यातील सास्ती येथे भाजपने दणदणीत विजय मिळविला आहे. यामध्ये भाजपने सरपंचासह १० जागा ताब्यात घेऊन बहूमत मिळविला आहे. ब्रम्हपुरी तालुक्यातील कहाली येथे सरपंच पदावर अश्विनी अशोक राऊत ह्या सरपंच पदावर विजयी झाल्या. त्यांचे ग्राम विकास आघाडीचे ७ सदस्य विजयी झाले. ह्या पैकी दोन सदस्य हे अविरोध निवडून आले. जिवती तालुक्यातील शेडवाही येथे अपक्षांचा बोलबाला राहिला आहे. शित्रू भिमराव सिडाम हे अपक्ष उमदेवार सरपंच पदावर विजयी झाले आहेत. सावली तालुक्यातील साखरी येथे सरपंचपदासाठी पोट निवडणूक पार पडली. यामध्ये काँग्रेसचे निलेश पेदोंर विजयी झाले.चंद्रपूर जिल्ह्यात ८ पैकी एका पोटनिवडणूकीसह चार ठिकाणी काँग्रेस, २ ठिकाणी शिवसेना (ठाकरे),१ भाजप तर दोन ठिकाणी स्थानिक पॅनलने सत्ता मिळविली आहे.

## ग्रामपंचायत सालोड (हि.) येथे मतदार यादी वाचन



**सालोड (वर्धा) । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत सालोड येथे मतदार यादी वाचन करण्यात आले याकरिता उपजिल्हा निवडणूक अधिकारी अनिल कुमार गावित तहसीलदार कोळपे, सरपंच अमोल कन्नाके उपसरपंच अशीष कुचेवार ग्रामपंचायत सदस्य सुरेश ठाकरे ,अतुल जुडे, दादा चरडे , लोकेश मडावी, मनोज देवघरे, अमोल वंजारी व गावातील नागरिक, पत्रकार संरक्षण समिती वर्धा तालुका अध्यक्ष बाळासाहेब वाघ ,सलीम पठाण प्रभाकर फटिंग उपस्थित होते.तसेच सर्व बी एल ओ नेहरू विद्यालय चे मुख्याध्यापक पीएम चरडे उपस्थित होते .तहसीलदारांनी नव मतदार व शुद्धीकरण बाबत माहिती दिली उपजिल्हा निवडणूक अधिकारी गावीत यांनी मतदानाचा अधिकार व १८ वर्षावरील सर्वांचे मतदार यादी मध्ये नाव नोंदवण्याकरिता मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे संचालन तेलरांधे व आभार प्रदर्शन तुषार वर्गणी यांनी केली.

## ब्रम्हपुरी तालुक्यात वाघिणी पाठोपाठ वाघाला पकडण्यात वनविभागाला यश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ब्रम्हपुरी वनपरिक्षेत्रातील आवळगाव उपक्षेत्रात ५ नोव्हेंबरला सायंकाळच्या सुमारास वनविभागाने बेशुद्ध करून वाघिणीला जेरबंद केले, तर ६ नोव्हेंबर रोज सोमवारला सकाळी आठच्या सुमारास त्याच भागातून नर वाघालाही जेरबंद करण्यात वनखात्याला यश आले .

बऱ्याच दिवसांपासून बरेच दिवसांपासून या दोन्ही वाघांची परिसरात दहशत होती. या वाघांना जेरबंद केल्याने स्थानिक गावकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास घेतला.

हळदा शेतशिवारात काम करण्यासाठी गेलेल्या एका महिलेवर बुधवारी वाघाने हल्ला करून तिला जागीच ठार केले. त्यानंतरही या परिसरात पाळीव जनावरांवर वाघांचे हल्ले सुरूच होते. त्यामुळे परिसरात वाघाची दहशत निर्माण झाली होती. त्यानंतर वनविभागाने या परिसरात कॅमेरे लावून या वाघांवर पाळत ठेवली.यात नर व मादी असे दोन वाघांची जोडी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर ५नोव्हेंबरला सायंकाळी



वाघिणीच्या स्थळाची माहिती मिळताच हळदा नियतक्षेत्रात वनविभागाचे कर्मचारी दाखल झाले. यावेळीताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे पशुवैद्यकीय अधिकारी (वन्यजीव) डॉ. आर. एस. खोब्रागडे, पोलीस नाईक (शूटर) अरुण मराठे, वन परिक्षेत्राधिकारी आर.डी. शेंडे, जीवशास्त्रज्ञ राकेश आहुजा व ब्रम्हपुरी वनविभाग पथकाने या वाघिणीला बेशुद्ध करून पकडले.त्यानंतर ६ नोव्हेंबरला सकाळी साडे आठच्या सुमारास याच परिसरातून एक नर वाघालाही बेशुध्द करून वनविभागाने पकडले. महिलेवर झालेला हल्ला व पाळीव प्राण्यांवर होत असलेले हल्ल्यांमुळे वनविभागाने ही कारवाई केली. यामुळे स्थानिक नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. या दोन्ही वाघांची रवानगी चंद्रपूर येथील टीटीसी केंद्रात करण्यात आली.

## सालोरी ग्रामपंचायतवर काँगेसचा झेंडा

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील अवघ्या १० किलोमीटर अंतरावर असलेल्या सालोरी येथील अंदाजे ३ हजार लोकसंख्या व १९७० मतदार संख्या असलेल्या ९ सदस्यीय ग्रामपंचायतीवर काँग्रेसच्या प्रतिभा शेरकुरे सरपंच पदी निवडून आल्या असून काँग्रेसचेच राहुल मारोती शेरकुरे, सीमा तुलसीदास मगरे, संगीता नागोराव ननावरे, रामचंद्र रघुनाथ उईके हे सदस्यपदी निवडून येऊन सालोरी ग्रामपंचायत वर बहुमताने सत्ता काबीज केली आहे.

मागील २०-२५ वर्षापासून सालोरी ग्रामपंचायत वर राष्ट्रवादी व इतर पक्षाचा वर चष्मा होता. राष्ट्रवादीचे माजी जिल्हा परिषद सदस्य दिपक गायकवाड हे सलग दहा वर्ष सालोरी च्या सरपंच पदी विराजमान होते हे विशेष. त्यामुळे सालोरी ग्रामपंचायत राष्ट्रवादीचा गड मानल्या जात होता. त्या राष्ट्रवादीच्या गडाला आज खिंडार पाडत काँग्रेसने एक हाती सत्ता काबीज केली.

ही निवडणूक काँग्रेसने वरोरा- भद्रावती



विधानसभेच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरोरा तालुका अध्यक्ष मिलिंद भोयर यांच्या नेतृत्वात लढविली होती. त्यात त्यांना यश आले असून विजयी करण्यासाठी विद्यार्थी काँग्रेस तालुकाध्यक्ष रुपेश तेलंग, युवक काँग्रेस उपाध्यक्ष राहुल नन्नावरे, सेवा सहकारी संस्था अध्यक्ष अरुण शेरकुरे, भुषण पाटील, अमोल शेलकर,प्रभुदास पाटील, मधुकर पुसनाके, राजेंद्र मडावी, मारोती मिलमिले, किशोर मडावी, मिथुन आत्राम, निलेश गायकवाड, हनुमान घरत, अनिल शेरकुरे, विकास जांभुळे, मारोती चौखे, नामदेव मगरे, मनोहर रंदई, संजय काळमेंघे, कैलास तुमसरे,चंपत ढोक,कवडू वाघ, सचिन शेंडे, स्वप्निल दडमल यांनी अथक परिश्रम घेतले.

सह्याद्रीचा राखणदार



# संपादकीय

## तारीख पे तारीख...



संसदेच्या बहुतेक अधिवेशनांमध्ये येतो; तसा पावसाळी अधिवेशनातही 'देशात विविध न्यायालयांमध्ये एकूण किती खटले प्रलंबित आहेत?' असा प्रश्न आला. याचे उत्तर देताना केंद्रीय कायदेमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी दिलेली माहिती धक्कादायक होती. देशभरातील खटल्यांनी पाच कोटींचा आकडा ओलांडला होता. कनिष्ठस्तर दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत एक जुलै, २०२३ रोजी पाच कोटी दोन लाख खटले प्रलंबित होते. एव्हाना हा आकडा वाढला असेल. यात सुप्रीम कोर्टातला आकडाच ६९ हजार ७६६ होता.देशात २५ उच्च न्यायालये आहेत. त्यांच्यासमोरच्या थकित खटल्यांची संख्या ६० लाख ६२ हजार ९५३ आहे. त्यापुढे जिल्हा व इतर न्यायालयांमध्ये मिळून चार कोटी ४१ लाखांहून अधिक प्रलंबित खटले. देशाची लोकसंख्या १४१ कोटी आहे. पाच जणांचे एक कुटुंब असेल तर दर पाचवे-सहावे कुटुंब कोणत्या ना कोणत्या कज्जेदलालीत अडकले आहे. हे तितकेच नाही. देशातील एकूण खटल्यांपैकी ४६ ते ४८ टक्के प्रकरणांमध्ये राज्य अथवा केंद्र सरकार, सरकारी संस्था, खाते किंवा विभाग वादी वा प्रतिवादी आहे. म्हणजे सारी सरकारी यंत्रणाच 'भांडकुदळ आणि कज्जेदलाल' आहे. या पार्श्वभूमीवर तडफदार सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी दिलेला इशारा लक्षात घ्यावा लागेल. 'सर्वोच्च न्यायालयाला 'तारीख पे तारीख' कोर्ट बनवू नका,' असे त्यांनी नुकतेच खडसावले. यामागे सज्जड आकडेवारीचा आधार होता. एक सप्टेंबर ते तीन नोव्हेंबर या काळात सर्वोच्च न्यायालयासमोर रोज सरासरी १५४ आवेदने 'पुढची तारीख द्या' अशी येत होती. हा क्रम वर्षानुवर्षे असाच आहे. केंद्र सरकार, सर्वोच्च न्यायालय आणि नोकरशाही यांनी मनावर घेतल्याशिवाय या खातेऱ्यातून देश कधीही बाहेर येणार नाही.हिंदी चित्रपटसृष्टीइतके भारतीय मन कुणालाही समजलेले नाही. हिंदी सिनेमांचा सखोल समाजशास्त्रीय अभ्यास होईल तेव्हा होईल; पण आपला स्वातंत्र्योत्तर प्रवास आणि हिंदी सिनेमांचा प्रवास हे समांतरच आहेत. सरन्यायाधीशांनी 'दामिनी' चित्रपटातील सनी देओल यांचा संवाद उद्धृत करावा, यातच सारे आले. वकिलाच्या भूमिकेतील सनी देओल म्हणतात, 'तारीख पे तारीख, तारीख पे तारीख, तारीख पे तारीख, तारीख पे तारीख मिलती रही है, लेकिन इन्साफ नही मिला मिलॉर्ड. इन्साफ नही मिला. मिली है तो सिर्फ तारीख...' सनी देओलचा चढत जाणारा क्रुद्ध आवाज ऐकून केवळ सिनेमातल्या कोर्टरूममध्ये टाळ्या पडत नाहीत. थिएटरेही दणाणून जात. भारतीय नागरिक सुसंस्कृत व असहाय असल्याने क्षोभाचा किंवा भावनांचा निचरा (कॅथर्सिस) असा करून तो शांत बसतो. पण न्याय न देता त्याचे आयुष्य सडवत ठेवणाऱ्यांना त्याची शरम वाटत नाही. न्यायदानाची गती वाढवायची असेल तर न्याययंत्रणा आणि सरकार यांच्यात अवाजवी संघर्ष होऊ नये, हे भान ना पूर्वीच्या सरकारांना होते; ना आत्ताच्या मोदी सरकारला आहे. सर्वोच्च न्यायालयात एकेका तारखेला लाखो रुपये घेणारे वकील आणि देणारे पक्षकार आहेत. त्यांचे सोडून द्या. पण तालुका किंवा जिल्हा पातळीवरच्या न्यायालयांमध्ये डोकावले तर असंख्य खंगलेले, कर्जबाजारी, डोळ्यांत न्यायाची आस घेऊन वर्षानुवर्षे न्यायालयाच्या पायऱ्या झिजवणारे हजारो लोक दिसतील. यातल्या अनेकांची आयुष्ये 'तारीख पे तारीख'ने बरबाद केली आहेत. याचे उत्तर काय आणि ते कोण देणार?देशात वकील आणि पक्षकारांना भरीस घालून कोर्टात नेणाऱ्या कज्जेदलालीवर कायद्याने बंदी आहे. अशा दलालांची यादी करावी आणि त्यांना आवाराच्या बाहेर ठेवावे, अशा सूचनाच न्यायालयांना असतात. प्रत्यक्षात ते तर दूर गेले नाहीतच; सरकारने उभी केलेली लोकन्यायालयांची यंत्रणा, तीन प्रकारचे लवाद आणि खासगी स्वरुपातली मध्यस्थी हेही उपाय अपुरे पडत आहेत. नागरिकांचा हा अ-न्यायछळ कमी व्हायचा असेल केंद्र व सर्व राज्य सरकारांनी आधी आपण पक्षकार असलेल्या खटल्यांचा तुंबारा वेगाने कमी केला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सालोसाल अडकलेल्या प्रकल्पांसाठी जशी 'प्रगती' ही मोहीम राबविली; तशीच वेगवान न्यायमोहीम राबवावी. दुसरीकडे, सर्व स्तरांवरच्या न्यायालयांनी 'तारीख पे तारीख'चा गोरखधंदा कमी करण्यासाठी खटला संपविण्याची स्पष्ट मुदत घालावी. या सव्यापसव्यात किती मनुष्यतास, संपत्ती आणि श्रम वाया जात असतील, याची कल्पनाही करवत नाही. यात 'कृत्रिम प्रज्ञा' म्हणजे एआयची भरघोस मदत घेता येईल. त्या दृष्टीनेही सर्वोच्च न्यायालयाने भरभर पावले टाकावीत. फौजदारी खटल्यांचे विश्वच वेगळे असते. मात्र, दिवाणी खटल्यांमध्ये एका बाजूला असहाय पक्षकार आणि दुसरीकडे प्रतिष्ठेच्या व अहंकाराच्या कुक्कुटझुंजी यांच्यामुळे सारा देश वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतीक्षेत ताटकळतो आहे. सरन्यायाधीशांनी मुखर केलेली वेदना 'दामिनी' चित्रपटात व्यक्त होऊन तीन दशके लोटली. आता या वेदनेचे उत्तर शोधण्यासाठी सुप्रीम कोर्ट व केंद्र सरकार काय करणार, हा खरा सवाल आहे.

# हम तुम दोनो जब मिल जाएंगे

आयसीसी विश्वचषकात सध्या दोन प्रकारचे संघ खेळत आहे. एक म्हणजे भारतीय संघ आणि दुसरा म्हणजे उर्वरित सगळे संघ. ज्याप्रकारे आपला संघ प्रतिस्पर्ध्याला सहजासहजी लोळवत आहे ते पाहता या विश्वचषकावर केवळ आणि केवळ आपल्याच संघाचा हक्क आहे असे वाटते. पण क्रिकेट हा बेभरवशाचा खेळ आहे. एखादा दिवशी कोणता संघ कशी कामगिरी करेल हे गुपीत असते. मात्र जोपर्यंत आपल्या संघाचा अत्यंत खराब खेळ होणार नाही किंवा मोठा उलटफेर होणार नाही अथवा डकवर्थ लुईस खेळखंडोबा करणार नाही तोपर्यंत वर्ल्ड इलेव्हन संघ जरी मैदानात उतरला तरी त्याला आपला संघ पुरून उरणार असेच काही दिसत आहे.झाले काय तर सुपर संडेला ईडन गार्डन वर टीम इंडियाने द.आफ्रिकेशी दोन हात केले होते. द.आफ्रिकेवर चोकर्सचा ठप्पा लागला आहे आणि काही केल्या तो मिटायचे नांव घेत नाही. खरेतर हा संघ मस्क्युलर, पॉप्युलर, स्पेक्टॅक्युलर असून वर्ल्ड कप च्या बाबतीत बॅचलर आहे. शिवाय त्यांच्याकडे रबाडा, यान्सन, लुंगी सारखे तेज बॉलर असून आजही आपल्या कडे त्यांच्या खेळाडूंची क्रेझ आहे. तरीपण ऐन मोक्याच्या क्षणी त्यांचा पप्पू कान्ट डान्स साला होतोय. या स्पर्धेत त्यांनी प्रथम फलंदाजी करतांना धावांचे डोंगर उभारले. पण पाठलाग करताना मात्र ते लटपटले, गळपटले. अगदी हाच किस्सा ईडन गार्डन वर बघायला मिळाला.रोहीतने नाणेफेक जिंकून चाणाक्षपणे फलंदाजी घेतली आणि प्रारंभी आपली गाडी टॉप गिअरला टाकली. प्रतिस्पर्धी गोलंदाज कोणीही असो, कोणतेही मैदान असो, रोहीतची बेधडक फलंदाजी संघाच्या धावगतीचा टेम्पो सेट करून देतो. मात्र अवघ्या चाळीशीत त्याची खेळी संपुष्टात आली आणि मैदानात विराट उतरला. मात्र गेल्या काही सामन्यांपासून त्याच्यामागे शतकाचे ग्रहण लागलेले दिसत आहे. रोहीतचा झंझावात संपताच विरोधी गोलंदाज लयात आले आणि केशव महाराजने शुभमनला चकवले. नव्वदीत दोन बळी मिळताच द.आफ्रिकेला हुरूप चढला आणि शम्सी, महाराज या फिरकीपटुंनी विराट, श्रेयसवर फास आवळले. महाराजने विकेट टू विकेट संथ चेंडू सोडले तर शम्सीने दोन्ही फलंदाजांचे पाय जखडून टाकले होते. सुसाट निघालेली आपली धावगती अक्षरशः धक्कागाडी झाली होती. विराटला ना स्ट्राईक रोटेट करता येत होते ना तो मोठे फटके मारत होता. तर केशव महाराजची अचूकता आणि शम्सीच्या निगेटीव्ह गोलंदाजीने श्रेयसला पुरते हैराण केले होते. अखेर ड्रेसिंग रूममधून रोहीतने वॉरंट पाठवताच श्रेयसची कळी खुलली. जणुकाही लंकेविरूद्धची मागचीच खेळी खेळत असल्यासारखे त्याने यान्सन, शम्सीचा समाचार घेणे सुरू केले. श्रेयसच्या तडाख्यातून वाचण्यासाठी गोलंदाजांनी चेंडूची गती कमी केली आणि त्यांना त्याचा लगेच फायदा झाला. लुंगी ने श्रेयसला झेलबाद करताच राहुल मैदानात आला. पण पुन्हा एकदा आपल्या धावगतीने गोगलगाईचे रुप घेतले. जणुकाही आपल्या फलंदाजांनी विश्वशांतीचा वसा घेतल्यासारखे ते शांतपणे खेळत होते.अखेर या पेचप्रसंगात आपला बळी देत राहुलने सूर्यासाठी मार्ग मोकळा करून दिला. सूर्याने शॉर्ट बट स्वीट खेळी करत संघाची



सुटका केली. त्याची १४ चेंडूतील २२ धावांची खेळी संघाचे मनोबल आणि धावगती वाढवून गेली. मात्र रिव्हर्स स्विपच्या नादात तो आपली विकेट गमावून बसला. तत्पूर्वी विराटचे खग्रास ग्रहण सुटले आणि तमाम क्रिकेटप्रेमींनी सुटकेचा निःश्वास टाकला. आपल्या वाढदिवसाला सचिनच्या ४९ शतकांची बरोबरी करत कोहलीने आणखी एक विराट पाऊल टाकले आहे. मात्र आजची विराटची खेळी नेहमी प्रमाणे फ्री फ्लोविंग नव्हती. कुठेतरी शतकाचे स्पीड ब्रेकर त्याला रिस्क घेऊ देत नव्हते. अखेर सर जडेजा टीम इंडियाच्या मदतीला धावून आले आणि आपण सव्वा तीनशेला ओलांडू शकलो.प्रत्युत्तरात द.आफ्रिकेची झालेली वाताहत कल्पनातीत आहे. समोर सव्वातीनशेचे ओझे आणि सामना होता बुमराह, सिराज, शमीच्या धारदार गोलंदाजी सोबत. त्यातही द.आफ्रिकेचे फलंदाज म्हणजे मन के हारे सब हारे होते. सिराज काय, शमी काय आणि जडेजा काय! जणुकाही हर गेंद पे लिखा है विकेट का नाम! कोण कोणाला बाद करेल याचा नेम नव्हता. इनकमींग आऊटगोईंग फ्री असल्यासारखे त्यांचे फलंदाज आतबाहेर येतजात होते. सिराज, शमी, जडेजा आणि कुलदीपने फुल लेंथ, गुडलेंथ गोलंदाजी करत द. आफ्रिकेचा अवघ्या ८३ धावांत फडशा पाडला. सध्या आपले गोलंदाज स्वप्नवत कामगिरी करत आहेत. बुमराह, सिराज प्रतिपक्षाला खिंडार पाडतात तर शमीची गोलंदाजी म्हणजे तुम मुझे गेंद दो, मै तुम्हे विकेट दुंगा सारखी असते. चायनामन कुलदीपची फिरकी आणि जडेजा ची काटेकोर गोलंदाजी भेदने विरोधी फलंदाजांना जड जात आहे.थोडक्यात काय तर आश्वासक फलंदाजी, धारदार गोलंदाजी आणि चपळ क्षेत्ररक्षणाला रोहीतच्या नेतृत्वाचा सुवर्ण मुलामा लाभल्याने टीम इंडिया अजेय झाली आहे. असा धाक्कड संघ सध्यातरी या स्पर्धेत दिसून येत नाही. ज्याप्रकारे हा संघ विरोधकांवर केवळ मात करत नाही तर मानहानीकारक पराभव करतो ते पाहता लंकेच्या नेतृत्वात इतर संघांनी टीम इंडियावर अब्रुनुकसानीचा दावा करायला हरकत नाही. टॉस जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय, रोहीतची दणकेबाज सुरूवात, विराट श्रेयसची शतकी भागीदारी, विराटचे बहुप्रतिक्षित शतक, सूर्या जडेजाची छोटेखानी परंतु वेगवान खेळी, सिराज शमीचा भेदक मारा आणि जडेजाचे पाच बळी हे या लढतीचे वैशिष्ट्य ठरले. तर तब्बल दोन नो बॉल, बावीस वाईड सहीत एकंदर २६ अवांतर धावा देत द.आफ्रिकेने बेशिस्त गोलंदाजीचे दर्शन घडवले. भरीस भर म्हणून त्यांच्या कचखाऊ फलंदाजीने उरलीसुरली कसर भरून काढली.विश्वचषकापासून टीम इंडिया अवघे दोन पाऊले दूर आहे. तोपर्यंत संघाची लय अशीच राखणं अत्यंत गरजेचे आहे. टीम इंडिया तिसऱ्यांदा एकदिवसीय विश्वचषक उंचावण्यास जरूर सक्षम आहेत. निश्चितच आपले फलंदाज आणि गोलंदाज मिळून हम तुम दोनो जब मिल जाएंगे, इक नया इतिहास बनाऐंगे अशी आशा आहे.


डॉ.अनिल पावशेकर
मो. ९८२२९३९२८७

## 'गगन सदन तेजोमय' दिवाळी पहाटचे 'ध्यास सन्मान' जाहीर

# रविवार १२ नोव्हेंबर, सकाळी ७ वाजता,शिवाजी पार्के, दादर येथील स्वा. सावरकर सभागृहात भव्य सोहळा

**मुंबई । प्रतिनिधी**

'गगन सदन तेजोमय' ही पहिली दिवाळी पहाट शिवाजी पार्कवर, १९ वर्षांपूर्वी सादर झाली. उत्तरोत्तर दिवाळी पहाटचे कार्यक्रम रंगले. त्याला जोड होती समाजऋणाची. कृतज्ञतेची. सामाजिक भान राखत जीवन वेचणार्या समाजव्रती व्यक्ती आणि संस्था यांच्या कार्याबद्दल, एका ध्यासाने जीवन जगणाऱ्या आणि समाजाला समृद्ध करणार्या कलाकारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा'ध्यास सन्मान' गेली अठरावर्षे प्रदान करण्यात आला आहे. यात श्रीनिवास खळे, ज्येष्ठ पत्रकार निळू दामले, डॉ. रवी बापट, शेखर देशमुख - पत्रकारिता, मंगेश पाडगावकर, ज्योती पाटील, श्रीमती रेखा मिश्रा - रेल्वे पोलीस दल, अविनाश गोडबोले, ओमप्रकाश चव्हाण अशा व्यक्ती आणि भटक्या विमुक्त जमातीसाठी काम करणारे गिरीश प्रभुणे, राजाराम आनंदरावभापकर (भापकर गुरुजी), पुणे, माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान - सोलापूर, श्री पवनपुत्र व्यायाम मंदिर, प्रगती अंध विद्यालय बदलापूर, जन-आधार सेवाभावी संस्था लातूर, भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान कुडाळ, संपूर्ण बांबू केंद्र) - मेळघाट, निवांत अंधमुक्त विकासालय संस्था -पुणे, रविकिरण मंडळ -




मुंबई, माँ अन्नपूर्णा सेवा समिती - अकोला, संवेदना सेरेड्रल पालसी विकसन केंद्र,अहिल्या महिला मंडळ - पेण, डॉ. अनंत पंढरे - हेगडेवार रुग्णालय - औरंगाबाद, जीवन ज्योती ट्रस्ट - मुंबई, लक्ष्य फाउंडेशन - पुणे, मातृछाया ट्रस्ट - गोवा, 'सावली' - अहमदनगर, वालावलकर रुग्णलय - डेरवण, वनवासी कल्याण केंद्र, तलासरी, सुहित जीवन केंद्र - पेण, नाना पालकर स्मृती समिति, अनिता मळगे, मा. मधुकर पवार, दत्तात्रय वारे - जत, सुहासिनी माने - फलटण अशा संस्था यांचा समावेश आहे. असा गौरव करणारी ही एकमेव दिवाळी पहाट आहे, असे विनोद पवारसांगतात.यावर्षी अहमदनगर जिल्ह्यातील देवगाव या प्राथमिक शाळेचा एक आदिवासी शाळकरी विद्यार्थी आर्यन भांगरे याचा तसेच संस्था म्हणून विद्यार्थीउत्कर्ष मंडळ, चिंचपोकळी व नाट्यपराग संस्था, घाटकोपर यांचा गौरव 'ध्यास सन्मान' प्रदान करून केला जाणार असल्याचे महेंद्र पवार यांनी कळवले आहे. त्यासोबत दीपिका भिडे - भागवत सादर करणार आहेत भक्तिगीते.त्याचे निरुपण डॉ. वंदना बोकील कुलकर्णी यांचे आहे. 'आनंदाचा कंद' असे शीर्षक असलेल्या या कार्यक्रमाचे निवेदन प्रमोद पवार करतील. विनोद पवार आणि महेंद्र पवारयांची संकल्पना, संयोजन असलेलीही दिवाळी पहाट रविवार, १२ नोव्हेंबर २०२३रोजी, सकाळी ७ वाजता, शिवाजी पार्क, दादर येथील स्वा. सावरकर सभागृहात संपन्न होणार आहे.

# जुगाडपंथाची नवी जादू

फेरीवाल्यांच्या अतिक्रमणावर उतारा म्हणून मुंबईत भूमिगत बाजार बांधण्यात येणार आहे. मुंबईकरांच्या डोळ्यांत धूळफेक करण्याची ही नवी आयडिया आहे. यापूर्वी मुंबईकरांनी अशी बरीच मूर्खांची नंदनवने अनुभवली आहेत.मुंबईत जागोजागी होणाऱ्या अतिक्रमणांमुळे आता राजधानी दिल्लीच्या धर्तीवर धरतीखाली भूमिगत बाजार बांधण्याची कल्पना म्हणजे लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करण्याची नवी 'आयडिया' आहे. यापूर्वी मुंबईकरांनी अशी बरीच 'मूर्खांची नंदनवने' अनुभवली आहेत. यातले एक म्हणजे रस्त्यांवर प्रचंड गर्दी आणि फेरीवाले असल्याने रस्त्यांच्या डोक्यावर बांधलेले स्काय वॉक. या सगळ्या आकाशमार्गांची स्थिती काय आहे, हे एकदा पाहायला हवे. यातले काही तर नंतर भंगाराच्या भावात विकावे लागले.आधीच प्रचंड धावपळ करणारे मुंबईकर ५०-५० पायऱ्या चढून हे मार्ग वापरतील का, इतकी साधी शंका तेव्हा हे जुगाड करणाऱ्यांना आली नाही. नंतर मुंबईत नागरिकांच्या सोयीसाठी बहुमजली पार्किंग इमारती बांधण्यात आल्या. असे वर जाऊन कोणी गाड्या लावते का? पावसाळ्यात जागोजागी पाणीउपसा पंप बसविणे किंवा प्रचंड मोठे भूमिगत तलाव बांधणे या कल्पना आज यशस्वी झाल्यासारख्या वाटत असल्या, तरी ती नगर नियोजनाची खरी उत्तरे नाहीत. दिल्लीच्या भूमिगत पालिका बाजारात केवळ ३८० दुकाने आहेत. मुंबईतल्या आजच्या फेरीवाल्यांची संख्या दीड लाखापेक्षा जास्त आहे. या सगळ्यांना सामावून घेण्यासाठी संपूर्ण मुंबईच्या खाली बाजारपेठ बांधावी लागेल. मुंबईचे दिवंगत माजी आयुक्त शरद काळे 'मुंबईत



वरच्यापेक्षा खाली जास्त गर्दी आहे,' असे म्हणत. सगळ्या सेवांच्या भूमिगत जाळ्यांविषयी ते हे सांगत असत. त्यानंतर आता मुंबईत भूमिगत मेट्रोही होते आहे. मुंबई आणि दिल्ली यांचे भूगोल पूर्ण भिन्न आहेत. हवामान वेगळे आहे. पाऊसमानात फरक आहे आणि वर्तनशैलीही भिन्न आहे. पर्यटकांना आकर्षण म्हणून एखादी भूमिगत बाजारपेठ बांधणे वेगळे आणि फेरीवाल्यांच्या प्रश्नावरचे 'हे घ्या उत्तर...' अशा थाटात भूमिगत बाजाराची संकल्पना मांडणे वेगळे.पावसाळ्यात साध्या रस्त्यांवरचे आणि रेल्वेच्या रुळांवरचे पाणी यंत्रणांना आटोपत नाही. नागरिकांसाठी केलेल्या रस्त्यांखालच्या सबवेंमध्ये मोकळी हवा खेळवता येत नाही. शंभर मीटर चालेपर्यंत लोक गुदमरण्याची वेळ येते. रेल्वेच्या जिन्यांवर माणसे केवळ गर्दी होऊन चेंगराचेंगरीत मरण पावतात. ज्या पालिका, नोकरशाही आणि सरकारला हे जिथे सांभाळता येत नाही, तिथे भूमिगत बाजारांचे फुगे कशासाठी सोडले जातात? एखादी संस्था, कंपनी साग्रसंगीत अहवाल बनवून सरकारच्या पुढ्यात काहीतरी कल्पना मांडते, ती इतरही हितसंबंधियांच्या सोयीचीच असते. मग स्वीकारा ती आणि बांधा करदात्यांच्या पदरात धोंडे, असे तर हे नाही ना?=

# हम बहुउद्देषिय संस्था चंद्रपूर द्वारा आयोजित ‘द कॉन्शस’ ने नाट्यरसिकांची मने जिंकली

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

हम बहुउद्देशिय संस्था चंद्रपूर द्वारे डॉ. हेडगेवार जन्मशताब्दि सेवा समिती द्वारा संचालित सेवा प्रकल्प व निराधारा प्राण्याची सेवा करणारी प्यार फाऊँडेशन या दोन संस्थांच्या आर्थिक मदतीकरीता दि ०४ नोव्हेबर रोजी अमेय दक्षिणदास लिखित व ड.चैताली कटलावार दिग्दर्शीत दोन अंकी मराठी नाटक ‘‘द कॉन्शस’’ चा यशस्वी प्रयोग मोठ्या थाटात उत्साहात पार पडला.

स्थानिक प्रियदर्शीनी सांस्कृतिक सभागृह येथे आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन चंद्रपूरचे ज्येष्ठ विधिज्ञ तथा लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे अध्यक्ष ड.रविंद्र भागवत व चंद्रपूरचे आ. किशोर जोरगेवार यांचे हस्ते दिप प्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी चांदा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. डॉ. अशोक जिवतोडे, सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष ड.हिराचंद बोरकुटे, नाट्यशिबीरांच्या माध्यमातून उदयोन्मुख नाट्य कलावंत घडविणारे सुशील सहारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

‘‘द कॉन्शस’’हे नाट्य नव्या कल्पनेला अनुरुप असे नाविण्यपूर्ण असल्याने रसिकांचा या नाट्यप्रयोगास उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या नाटकातील कलावंतांनी आपआपल्या भूमिकेला न्याय दिला. मि. शाम यांची भूमिका विशाल ढोक, मिरा चे पात्र ड.चैताली बोरकुटे-कटलावार तर मनस्वी चे पात्र नामू ऊर्फ नामदेव बदखल यांनी साकारली. त्यांच्या भूमिकांनी प्रेक्षकांच्या ह्रदयाचा ठाव घेतला. तेजराज चिकटवार यांचे नेपथ्य व हेमंत गुहे यांच्या प्रकाशयोजनेने रसिकांची मने जिंकून घेतली. डिलीव्हरी बॉय म्हणून रोशनसिंह बघेल, पंकज मलिक यांचे संगीत व प्रियंका ढोक यांची रंग व वेशभूषेनेही रसिकांची मने जिंकली.या कार्यक्रमात नाट्यक्षेत्रात योगदान देणारे सुप्रसिध्द नेपथ्यकार दिगांबर इंगळे, प्रकाशयोजनाकार हेमंत गुहे व रंग व वेशभूषाकार नितीन तोडे यांना आ. किशोर जोरगेवार व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते मानपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमातीला योगदान व सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने पवन सादमवार, हिरेन शाह, सचिन इंगळे, परवेज धनानी, मुकुंद दुबे, मिथून मेश्राम, प्रेमकुमार उपरे, ड.आसिफ शेख, संतोश गोविंदवार, ड.विजय मोगरे, देवराव भोंगळे, डॉ मंगेश गुलवाडे, ड.सुरेश तालेवार, राम पल्लेवार, निलिमा शिंदे , डॉ सचिन भेदे, संजय कंचर्लावार यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.नाटकाचे निर्मिती सुत्रधार ड.अभय पाचपोर, श्रीकृष्ण लाडके, अभिजित कटलावार व राहुल बनकर यांचाही सन्मान करण्यात आला. क्रिएटिव्ह फिंगर(कले साठी कला) चे उद्घाटन आ. किशोर जोरगेवार यांचे हस्ते करण्यात आले.सदर नाटकाचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी प्रमिला बोरकुटे, नितिन इंगोले, प्रफुल आस्वले, रविशंकर गावंडे, बबन राखुंडे, शशांक गाढवे, पंकज नवघरे, बाबा खिरेकर, सुरज उमाटे, अंकुश राजुरकर, केविंद्र बारसागडे, वैशाख रामटेके, प्रज्वल निखार, रवींद्र वंडरे यांचे विशेष सहकार्य लाभले.



# दिवाळी साजरी करतानाच रांगोळी स्पर्धेत सहभागी व्हावे – अल्का आत्राम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भाजपा महिला मोर्चा चंद्रपूरच्या वतीने बेटी बचाओ पढाओ रांगोळी स्पर्धा घर तिथे रांगोळी आयोजित करण्याच्या निमित्ताने ६ नोव्हेंबरलाजिल्हा बैठक पार पडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासून मुलींचे शिक्षण ,मुलीची सुरक्षा आणि मुली महिला यांना आत्मनिर्भर सक्षम करण्यासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या. त्याचाच एक भाग आज महिला आत्मनिर्भर होऊ लागल्या सक्षम सन्मान प्राप्त करू लागल्या म्हणून त्या सर्व योजना घरा घरापर्यंत पोहचाव्यात यासाठी घर तिथे रांगोळी आयोजित करण्यात येणार आहे.



या रांगोळी स्पर्धेचे आयोजन विधानसभा स्तरावर होणार आहे यासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय आणि प्रोत्साहन पर बक्षीस ठेवण्यात येणार आहे. ही स्पर्धाची नोंदणी ६ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर पर्यंत करण्यात येईल रांगोळी स्पर्धा १७ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर पर्यंत होणार आहे. या बैठकीला अल्का आत्राम प्रदेश महामंत्री महिला मोर्चा यांचे अध्यक्षतेखाली, सविता पुराम सहसयोजिक बेटी पढाव बेटी बचाव, वंदना अगरकाठे महामंत्री तथा जिल्हा सयोजिक बेटी बचाव बेटी पढाव, विजयालक्ष्मी डोहे महामंत्री, सायरा शेख महामंत्री, रत्नमाला भोयर ओ बी सी अध्यक्ष, अर्चना जिवतोडे कोषध्यक्ष, आणि सर्व जिल्हा तालुका पदाधिकारी उपस्थित होते.अल्का आत्राम यांनी या स्पर्धेतून महिलांच्या योजना घरा घरात पोहचवा असे प्रतिपादन केले. सविता पुराम यांनी सर्व महिलांना स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केले.या स्पर्धेत नोंदणी करण्यासाठी तालुक्यातील भाजपा पदाधिकारी यांचेशी संपर्क साधावे तसेच जास्तीत जास्त संख्येनी सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा महिला मोर्चाचे वतीने करण्यात आले.

## तिसऱ्या रेल्वे लाईनमुळे नागरिकांच्या समस्या वाढल्या

# वर्धा ते बल्लारशाहा येणारी तिसरी रेल्वे लाईन मुळे ताडाळीसह मोरवा, येरुर, पडोली, येथील नागरिकांना समस्या

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडाली गावातील नागरिकांना वर्धा ते बल्लारशाहा येणारी तिसरी रेल्वे लाईनमुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. रेल्वे लाईनमुळे ताडाली गावातील मुख्य रस्ता कायमस्वरूपी बंद होणार असल्याचे रेल्वे विभागाकडून कळविण्यात आले आहे. यामुळे ताडाळीसह मोरवा, येरुर, पडोली, येथील ग्रामवासी संभ्रमात आहेत. या बाबत काँग्रेस नेते दिनेश चोखारे यांनी निवेदन दिले आहे.ताडाली गावातील लोकसंख्या ६५०० पेक्षा जास्त आहे. गावात प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा, शासकीय कार्यालये, बँकेची कार्यालये, अनेक औद्योगिक कारखाने आहे आणि शेतकरी मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे रहदारी खूप जास्त असते. रेल्वे लाईनमुळे मुख्य रस्ता बंद झाल्यास ग्रामस्थांना येण्या-जाण्यासाठी मोठी समस्या निर्माण होईल.याशिवाय, रेल्वे लाईनसाठी मोठ्या प्रमाणात शेती, घरे आणि प्लट भूसंपादन करण्यात आले आहे. परंतु काही भूधारकांना आर्थिक मोबदला मिळत नसल्याचे तक्रारी आहेत. तसेच, भूसंपादित जागेचा ताबा देण्यासाठी रेल्वे विभागाने अल्प वेळ दिला आहे. त्यामुळे ग्रामस्थांना राहत्या घराचे ताबा कसे काय घेऊ शकतात, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.या संदर्भात दिनेश चोखारे यांनी रेल्वे विभागाकडे निवेदन दिले आहे. त्यांनी रेल्वे लाईनमुळे निर्माण झालेल्या समस्या सोडविण्याची मागणी केली आहे.या निवेदनाची दखल घेऊन रेल्वे विभागाने समस्या सोडविण्याची कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे.



**ताडाली गावातील मुख्य रस्ता कायमस्वरूपी बंद होऊ नये. यासाठी ओव्हर ब्रिज बांधण्यात यावा. आणि संतगतीने सुरु असलेले काम त्वरित पूर्ण करून ग्रामस्थांना सहकार्य करावे. तसेच, भूसंपादित भूखंडधारकांना योग्य मोबदला मिळावा आणि त्यांना ताबा देण्यात यावा.**

# एस एन.डी.टी महिला विद्यापिठ बल्लारपूर आवार येथे मधुमक्षिका पालन प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम संपन्न

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर हे नेहमी शिक्षणासोबतच सामाजिक दायित्व पूर्ण करण्याचा दुष्टीने कार्य करत असते. अशाच एका सामाजिक कर्तव्याची जाण राखत एस.एन.डी.टी महिला विद्यापिठ मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकूल, बल्लारपूर, चंद्रपूर येथे तीन दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण घेण्यात आले होते. खादी आणि ग्रामोद्योग आयोग, नागपूर विभाग आणि एस.एन. डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकूल, बल्लारपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने हे तीन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले होते सोबतच चंद्रपूर जिह्यातील जूनोना या गावात सुध्दा हे तीन दिवसीय प्रशिक्षण पार पडले होते.या कार्यक्रा अंतर्गत एस. एन. डी. टी. चे प्रशिक्षणार्थी आणि जूनोना या गावातील प्रशिक्षणार्थी यांना एकत्रित करून प्रमाणपत्र वितरण सोहळा विद्यापीठाच्या बल्लारपूर आवारात आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले होते. प्रमुख पाहुणे म्हणून खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे, विभागीय संचालक राघवेंद्र महेंद्रकर प्रामुख्याने उपस्थित होते. विभागीय समन्वयक विजय ठाकरे, मास्टर ट्रेनर प्रशांत सावंत, सहायक कुलसचिव डॉ बाळू राठोड, बल्लारपूर आवाराचे समन्वयक वेदांनद अलमस्त उपस्थित होते.प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत सावंत यांनी केले.विभागीय संचालक राघवेंद्र महेंद्रकर चित्रफीतच्या आधारे निर्माण सेवा आणि सेवा क्षेत्र यामध्ये किती कर्जाची मर्यादा आहे आणि




विविध उद्योगासाठी जसे कुंभारकाम, मधुमक्षीका यासाठी शासनाच्या विविध योजना सांगितल्या. प्रधानमंत्री रोजगार सृजन कार्यक्रम याबद्दल सुद्धा माहिती दिली. उज्वल भविष्यासाठी रोजगाराच्या नवीन संधीविषयी त्यांनी यावेळी सांगितले. सोबतच व्यवसायात खूप मोठी संधी उपलब्ध असल्याने जास्तीत जास्त महिलांनी व्यवसायात आपले नशीब आजमवण्यासाठी तयार राहावे असे आव्हान सुध्दा त्यांनी केले.अध्यक्ष म्हणून लाभलेले एस. एन.डी. टी. महिला विद्यापीठ, बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी मधुमक्षिका पालन या व्यवसायातून महिला सक्षमीकरणासाठी जास्तीत जास्त महिलांनी पुढे येऊन मेहनत करणे गरजेचे आहे तसेच भविष्यात असे अनेक उपक्रम पुन्हा पुन्हा घेत राहू असे मत व्यक्त केले.या तीन दिवसीय प्रशिक्षणातून बरेच शिकायला मिळाले,रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या असे मनोगत काही प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केले.यावेळी संचालकांच्या हस्ते सर्व प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.यावेळी कार्यक्रम दरम्यान खादी विषयी माहिती देणारी प्रदर्षणी आवारात लावण्यात आली होती. यातून अनेकांना खादी विषयी माहिती मिळाली.सदर कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रा.नेहा गिरडकर यांनी केले.

## बल्हारशाह–वर्धा डेमू ट्रेनच्या वेळेत बदल केल्याबद्दल

# रेल्वे सुविधा संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले हंसराज अहीर यांचे अभिनंदन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रवासी, नोकरदार व रेल सुविधा संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या मागणीची दखल घेवून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी अखेर ट्रेन क्र. ०१३१६ बल्हारशाह-वर्धा या विशेष डेमू ट्रेनच्या वेळापत्रकामध्ये बदल करवून घेत जिल्ह्यातील प्रवाशांना दिलासा दिला आहे.



सदर ट्रेन ही यापूर्वी बल्हारशाह स्थानकातून सायंकाळी ०५.०० वा सोडण्यात येत होती. त्यामुळे जिल्ह्यातील रेल्वे प्रवासी विशेषतः शासकीय कर्मचाऱ्यांसाठी ही ट्रेन असुविधाकारक ठरत असल्याने झेडआरयुसीसी चे सदस्य दामोदर मंत्री व रेल्वे सुविधा संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी हंसराज अहीर यांची भेट घेवून त्यांचेकडे ही अडचण व्यक्त केली होती. या अडचणीची दखल घेवून अहीर यांनी या डेमू ट्रेनची वेळ बदलण्याकरीता केंद्रीय रेल्वेमंत्री, रेल्वे बोर्ड चेअरमन यांचेशी पत्रव्यवहार व प्रत्यक्ष चर्चा करुन या ट्रेनची वेळ बदलवून बल्हारशाह-वर्धा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुविधा उपलब्ध केली आहे. आता ही डेमू ट्रेन बल्हारशाह वरुन सायंकाळी ०६.३० वा. सुटून चंद्रपूर येथे ०६.५३ वा. पोहचेल व ही ट्रेन वर्धेला रात्रो ०९.३० वा. पोहचणार आहे. या बदलामुळे नोकरपेशा लोकांना चांगली सुविधा झाली असून त्यांना कार्यालयाची वेळ सांभाळून यामुळे सोयीचा प्रवास करण्याची संधी मिळाली आहे.डेमू ट्रेनच्या वेळापत्रकात बदल करवून घेत जिल्ह्यातील प्रवाशांना सुविधा उपलब्ध केल्याबद्दल रेलसुविधा संघर्ष समितीचे पदाधिकारी सर्वश्री रमणीकभाई चव्हाण, दामोदर मंत्री, नरेंद्र सोनी, शाम सारडा, डॉ भूपेश भलमे, पूनम तिवारी, प्रदिप माहेश्वरी, अनिश दिक्षित, अशोक रोहरा, राजेश सादरानी, नरेश लेखवानी, संजय मंघानी, प्रमोद त्रिवेदी, सुदाम यादव, महावीर मंत्री, रमेश बोथरा, शकरसिंह राजपूरोहीत, प्रभाकर मंत्री, प्रल्हाद शर्मा, विनोद बजाज, मिलिंद दाभेरे, गौतम यादव यांनी हंसराज अहीर यांची भेट घेवून अभिनंदन केले. जिल्ह्यातील अन्य महत्वपूर्ण रेल्वे विषयक समस्या व आवश्यक असलेल्या ट्रेन सुरु करण्यास पुढाकार घ्यावा अशी मागणी केली. सदर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करतांना हंसराज अहीर यांनी मुंबई करीता थेट गाडी सुरु करण्यास तसेच अन्य रेल्वे विषयक प्रश्नांबाबत आपण प्रयत्न करु असे आश्वासन दिले. यासंदर्भात रेल्वे मंत्री व चेअरमन यांचेसोबत लवकरच बैठक घेत असल्याची माहिती त्यांनी रेल्वे समितीच्या पदधिकाऱ्यांना दिली.

# गोंडपिपरीत कोजागिरी स्नेहमिलन उत्साहात साजरा

## देवराव भोंगळे यांची उपस्थिती



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी गोंडपिपरीच्या वतीने नुकताच कोजागिरी स्नेहमिलन सोहळाआयोजित करण्यात आला.स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित राहून कोजागिरी उत्सवाचा आनंद लुटला.यावेळी भारतीय जनता पार्टीचे राजुरा विधानसभा अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराव भोंगळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

तालुका भाजपच्या वतीने आयोजित या कार्यक्रमादरम्यान विविध नृत्याविष्कार सादरीकरण पार पडले.यात लहानमोठ्यांपासून सर्वांचा सहभाग दिसून आला.कार्यक्रमाला भाजपचे तालुकाध्यक्ष बबन निकोडे,जिल्हा उपाध्यक्ष विनायक देशमुख,संजय उपगंन्लावार,साईनाथ मास्टे,राकेश पून,शहराध्यक्ष चेतनसिंह गौर,बाजार समिती संचालक सुहास माडुरवार,संचालक संदीप पौरकार,प्रकाश उत्तरवार,गणपती चौधरी(गुरुजी),नाना येल्लेवार,स्वाती वडपल्लीवार,अरुणा जांभुळकर,मनीषा दुर्योधन,कोमल फरकडे,पोचमलू उलेंदला,संजय झाडे,रितेश वेगीनवार,मनीष वासमवार,संतोष उपलांचीवार,रवी पावडे,सचिन बैस,नितीन वासाडे,सुरेश धोटे,श्रीनिवास पांजा,छबिलाल नाईक,अमोल मोरे,प्रज्वल बोभाटे,कोमल फरकडे यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.स्थानिक गोंडपिपरीकरांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला.

# अर्जुनी (तुकुम) ग्रामपंचायतीवर शिवसेना (उबाठा) गटाचे एकहाती वर्चस्व

# सरपंच पदाच्या उमेदवारांसह ७ उमेदवार विजयी तर सालोरी गटग्रामपंचायतमध्ये ३ उमेदवारांनी मारली बाजी

## जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी विजयी उमेदवाराचे केले अभिनंदन





**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील सालोरी गटग्रामपंचायत व अर्जूनी (तुकुम) ग्रामपंचायत निवडणुकीसाठी दिनांक ५ नोव्हेंबर रोजी मतदान पार पडले. या ग्रामपंचायत निवडणुकीच्या अंतिम निकाल सोमवारला समोर आला असून यामध्ये अर्जुनी (तुकुम) ग्रामपंचायतीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सरपंच पदाच्या उमेदवारासह ७ उमेदवार विजयी झाले असून एकहाती वर्चस्व निर्माण केले आहे. तर सालोरी गट ग्रामपंचायत मध्ये ३ उमेदवारांनी बाजी मारली आहे. या सर्व विजयी उमेदवारांचा शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी शाल व पुष्पहार घालून सत्कार करीत अभिनंदन केले.

वरोरा तालुक्यातील सालोरी गट ग्रामपंचायत व अर्जुनी (तुकुम) ग्रामपंचायत करिता निवडणुकीचे बिगुल वाजले होते. या दोन्ही ग्रामपंचायती करिता ५ नोव्हेंबर रोज रविवारला मतदान पार पडले. या दोन्ही ग्रामपंचायतीचा अंतिम निकाल ६ नोव्हेंबर रोज सोमवारला समोर आला असून यामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)गटाने बाजी मारली आहे.शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख प्रशांत कदम व शिवसेना विधानसभा संपर्क प्रमुख रितेश रहाटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली,शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्या सहकार्याने, शिवदूत बंडु डाखरे, सुधीर नन्नावरे यांच्या नेतृत्वात लढविण्यात आलेल्या निवडणुकीत तालुक्यातील अर्जुनी (तूकुम) ग्रामपंचायतीवर भगवा फडकला असून सरपंच पदाचे उमेदवारासह सर्व ७ उमेदवार विजयी झाले आहे. यामध्ये सरपंच पदाकरिता सोनू विकास हनवते यांनी ४९८ मतदान घेत विजय प्राप्त केला. तर ग्रामपंचायत सदस्य पदाचे उमेदवार प्रशांत श्रीराम, प्रकाश हनवते, संगीता सावसाकडे, प्रफुल्ल भेंडाळे,वैशाली अनिल जांभुळे, मेघा दत्तू कुमरे, जगदीश लक्ष्मण पेंदाम, माया राजेंद्र पोईनकर हे सर्व उमेदवार विजयी झाले आहे. तालुक्यातील सालोरी गट ग्रामपंचायत मध्ये विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, शुभम वाकडे यांच्या नेतृत्वात लढविण्यात आलेल्या निवडणुकीत ३ उमेदवारांनी बाजी मारली आहे. यामध्ये शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे गजानन हरिभाऊ देहारी, राहुल ढोके, सुवर्णा कुळमेथे विजयी झाले आहे. विजयी झालेल्या सर्व उमेदवारांचे शिवसेना जिल्हा कार्यालयात जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांनी शाल तसेच पुष्पगुच्छ देऊन सत्कार व अभिनंदन केले.यावेळी शिवसेना विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, शिवदूत बंडु डाखरे शिवसेना शहर प्रमुख संदीप मेश्राम, माजी नगरसेवक तथा शहर संघटक किशोर टिपले, शिवसेना विधानसभा मीडिया प्रमुख गणेश चिडे, शिवसेना उपशहर प्रमुख मनिष दोहतरे, ज्येष्ठ शिवसैनिक अनिल गाडगे समस्त शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते.

# हिंगणघाट, समुद्रपुर तालुक्यातील ग्रा.पं.निवडणकीत भाजपाची सरशी

## आ.कुणावार यांचे जनसंपर्क कार्यालयात विजयाचा जल्लोष




**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट समुद्रपूर विधानसभा मतदार संघातील ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकी नुकत्याच ५ नोव्हेंबर ला पार पडल्या.६ नोव्हेंबर रोजी हाती आलेल्या निकालानुसार भाजपाच्या उमेदवारांनी समुद्रपूर तसेच हिंगणघाट तालुक्यातील पाचही ग्रामपंचायतीवरती सत्ता प्राप्त करीत बाजी मारली. विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर कोणावार यांचे जनसंपर्क कार्यालयात निवडणुक निकालानंतर सर्व नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांनी आपली हजेरी लावली, आ. समिर कुणावार यांनी नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य तसेच सरपंचांचे स्वागत केले.

६ नोव्हेंबरला दुपारी सर्व नवनिर्वाचीत सदस्यांनी मोठा जल्लोष करीत विजयाचा आनंद साजरा केला, यावेळी गुलाल उधळीत भाजप कार्यकर्ते व नवनिर्वाचित पदाधिकारी बँडबाजाच्या तालावर नाचू लागले, आमदार कुणावार हे सुद्धा या विजयी उत्सवात सहभागी झाले.हाती आलेल्या निकालानुसार हिंगणघाट तालुक्यातील शेगाव (कुंड), धामणगाव,वालधूर गट ग्रामपंचायत, उमरी(येडे) येथे अनुक्रमे दिपाली किशोर वंजारी, हेमंत पंढरीनाथ शिंदे तसेच प्रमोद दामोदर येडे इत्यादी भाजप उमेदवारांनी सरपंचपदाची निवडणुक जिंकली तर समुद्रपूर तालुक्यातील दहेगाव (उजवणे) तसेच देरडा ग्रामपंचायत सरपंचपदी भाजपाचे अंकुश विठ्ठलराव खुरपडे तसेच पियुष अशोकराव भुसारी हे निवडून आले.हिंगणघाट तालुक्यातील शेगाव (कुंड) ही मोठी ग्रामपंचायत असून येथे अनेक वर्षापासून स्वतंत्र भारत पक्षाची एकहाती सत्ता होती. स्वतंत्र भारत पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे यांचे कार्यक्षेत्र असून त्यांनी स्वतःसुद्धा या निवडणुकीत ग्रामपंचायत सदस्य पदासाठी उमेदवारी केली होती, परंतु येथील मतदारांनी मधुसूदन हरणे यांचेसह हरणे समर्थीत उमेदवारांना सपशेल नाकारले, तालुक्यातील तिन्ही ग्रामपंचायतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेससुद्धा बॅकफूटवर आली असून येथे भाजपाने बहुमत प्राप्त केल्याचे दिसून येत आहे.समुद्रपुर तालुक्यातील दहेगाव (उजवणे) तसेच देरडा ग्रामपंचायतीतही भाजपच्या उमेदवारांनी आघाडी घेतली आहे, दहेगाव येथे ग्रामपंचायत सदस्य पदासाठी ७ पैकी ५ उमेदवार भाजपाचे आहे.देरडा येथील ग्रामपंचायतीत ७ पैकी ६ सदस्य भाजपाचे निवडून आले आहे.

# अन्यायकारक कारवाई रद्द करा अन्यथा विभागीय आयुक्त कार्यालयावर मोर्चा



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन डीएनई १३६ चे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष प्रकाश खरवडे यांचेवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी केलेली अन्यायकारक कारवाई मागे घेण्यात यावी यासाठी राज्याध्यक्ष संजीव निकम यांच्या मार्गदर्शनानुसार राज्याच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत चंद्रपूर जिल्हा ग्रामसेवक युनियनची विशेष सभा ४ नोव्हेंबरला कृषक हॉल पंचायत समिती चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आली होती.

सभेला राज्यस्तरिय पदाधिकारी दामोदर पटले ,राज्य कार्याध्यक्ष, कमलाकर वनवे राज्य संयुक्त सचिव, बबनराव कोल्हे ,माजी विभागीय उपाध्यक्ष अमरावती , हर्षदा बागडे विभागीय महिला संघटक नागपूर, आशिष भागवत जिल्हा सरचिटणीस अमरावती, विवेक धवड जिल्हा सरचिटणीस वर्धा. नवला घूटके जिल्हा कर्याध्यक्ष गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष प्रकाश खरवडे ,कार्याध्यक्ष विजय यारेवार ,सचिव पुंडलिकराव ठाकरे सर्व तालुका अध्यक्ष सचिव हे उपस्थित होते. ग्रामसेवकांचे सातत्याने आर्थिक ,मानसिक शोषण करण्याचा धडाका माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत यांनी लावला होता. त्यास जिल्हा ग्रामसेवक युनियनने विविध आंदोलनातून विरोध केल्याने आणि मंत्रालय पातळीवर तक्रारी केल्याने त्यांची बदली नागपूर येथे करण्यात आली. परंतु भविष्यात ग्रामसेवक युनियनने आंदोलन करूच नये ही दहशत निर्माण करून अन्यायाविरुद्ध कोणी आवाज उठवू नये यासाठी चंद्रपूर जिल्हाध्यक्ष प्रकाश खरवडे ग्रामसेवक पंचायत समिती वरोरा यांच्यावर सूडबुद्धीने दबाव गट तयार करून कोणतीही तक्रार नसताना निलंबन केलेले आहे.या विषयावर गंभीर्याने चर्चा करून सर्व राज्य प्रतिनिधी यांनी पंचायत समिती चंद्रपूर येथे ६ नोव्हेंबर ला दुपारी पाच वाजता काळ्याफिती लावून जाहीर निषेध नोंदविण्याकरिता आदेशित केले. तसेच दिनांक ८ नोव्हेंबर ला दुपारी २:०० वाजता जिल्हा परिषद स्तरावर काळ्या फिती लावून झालेल्या कारवाईचा निषेध नोंदवतील. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन निलंबन रद्द न केल्यास विभागीय आयुक्त नागपूर यांच्या कार्यालयावर संपूर्ण विदर्भातील ग्रामसेवकांचा भव्य मोर्चा काढण्यात येईल आणि यात सर्व राज्य अध्यक्ष तथा राज्यभरातील राज्य व जिल्हा पदाधिकारी सहभागी होतील असा निर्णय घेण्यात आला आहे. दंडात्मक कठोर कारवाई चुकीच्या पद्धतीने करीत असल्यास संपूर्ण महाराष्ट्रात निषेध नोंदवतील असे राज्य पदाधिकारी यांनी निर्णय घेतला आहे.

# तीनशे किलोमीटर पांदण रस्त्यांच्या मजबुतीकरणातून उजळणार गोंडपिपरी तालुक्यात विकासवाटा

## जिल्हा प्रशासनाचा बळीराजा समृद्ध शेत रस्ते उपक्रमांतर्गत पुढाकार



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

पांदण रस्ते समृद्ध शेती करिता महत्वाची भूमिका बजावतात.पण जागेच्या वादावरून अनेक ठिकाणी पांदण रस्ते होऊ शकत नाही.त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना शेतीत जाण्यासाठी रस्ताच नसतो परिणामी शेत पिकावरही परिणाम होतो.ही परिस्थिती लक्षात घेता जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी चंद्रपूर जिल्ह्यात पाच हजार किलोमीटरचे 'बळीराजा समृद्धी शेत रस्ते मोहीम' उपक्रमाअंतर्गत पांदण रस्ते तयार करण्याचा मेगा प्लॅन हाती घेतला आहे.त्याच पार्श्वभूमीवर नुकतीच गोंडपिपरीत बैठक पार पडली.

स्थानिक अधिकाऱ्यांनी तीनशे किलोमीटर रस्त्याच्या निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले असून युद्धपातळीवर काम सुरू आहे.या प्रकल्पाच्या प्रशासकीय कामाला सुरुवात झाली आहे पीक निघाल्यानंतर प्रत्यक्षात पांदण रस्ते तयार करण्याच्या कामाला सुरुवात होईल.यातून जिल्ह्यात समृद्ध शेती क्रांती होण्यात हातभार लागणार आहे. पांदण रस्त्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर ठराव घेतल्या जातील ते ठराव तहसीलदारांकडे पाठवले जातील तहसीलदार मार्फतीने बांधकाम विभागाकडून इस्टिमेट तयार केल्यानंतर प्रत्यक्ष जानेवारी महिन्यात बांधणार रस्ते तयार करण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. कुणी रस्त्याला मंजुरी देत नसेल तर त्यावर स्थानिक प्रशासन निर्णय देईल व मार्ग न निघल्यास पोलीस व महसूल विभाग संयुक्तरीत्या हे प्रकरण प्रकरण हाताळतील.गोंडपिपरी तालुक्यात हा उपक्रम राबवण्यासाठी उपविभागीय अधिकारी बालाजी शेवाळे यांनी संबंधित विभागाची बैठक घेतली.यात रस्त्याबाबतची माहिती देत या कामाला प्राधान्य देण्याचे आदेश दिले बळीराजा समृद्धी शेत रस्ते मोहीम या नावाने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.यावेळी तहसीलदार शुभम बहाकर,ठाणेदार जीवन राजगुरू,भूमिअभिलेखचे वराडे,कृषि अधिकारी सचिन पानसरे यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी,तलाठी,ग्रामसेवक,सरपंचाची उपस्थिती होती

# सीमेवरील कुपवाडा येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मंगळवारी स्थापित होणार छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा

## संकल्प पूर्णत्वास येतोय याचा अभिमान : ना. सुधीर मुनगंटीवार

**मुंबई । प्रतिनिधी**

जन्म देणाऱ्या मातेला आणि ज्या मातीत जन्माला आलो त्या मातीला आपला अभिमान वाटावा असे कार्य जीवनात व्हावे असा माझा सातत्याने प्रयत्न असतो . जम्मू काश्मीर मध्ये नियंत्रण रेषेजवळ कुपवाडा येथे आमचे आराध्य दैवत, आमचा स्वाभिमान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी आम्ही पुणेकर या सामाजिक संस्थेला पूर्ण सहकार्य करुन महाराजांचा पुतळा कुपवाडा येथे उभारण्याचा केलेला संकल्प पूर्ण होत असल्याचा अभिमान असून राज्याचे कर्तव्यदक्ष, संवेदनशील मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते, जम्मू- कश्मीर चे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्या उपस्थितीत मंगळवारी, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता हा अनावरण समारंभ संपन्न होणार आहे. अशी माहीती राज्याचे वने, सांस्कृतिक कार्ये व मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

कुपवाडा येथे होत असलेल्या या कार्यक्रमात वीर पत्नींना सन्मानित करण्यात येणार असून वीर शहीद कर्नल संतोष महाडिक यांना अभिवादन करण्यात येईल. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय रायफल्स-४१ चे जवान अतिशय उत्साहित असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी झटत आहेत. मागील आठवड्यात हा पुतळा जेव्हा या परिसरात दखल झाला तेव्हा जवानांनी ढोल ताशे आणि झांज वाजवून जल्लोषात स्वागत केले.छत्रपती शिवाजी महाराजांच्या या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन महाराष्ट्राचे



राज्यपाल रमेश बैंस यांच्या हस्ते व मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्ये मंत्री ना सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत दि. २० ऑक्टोबर रोजी राजभवन येथे झाल्यानंतर हा पुतळा कुपवाडाच्या दिशेने रवाना झाला होता. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार तसेच महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्यातून आम्ही पुणेकर या संस्थेतर्फे हा पुतळा उभारण्यात येत आहे. आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत जाधव आणि विश्वस्त अभयराज शिरोळे हे यांच्यासह त्यांच्या सदस्यांनी यासाठी परिश्रम घेतले आहेत. कुपवाडा येथील भारतीय सैन्याच्या छावणीत उभारण्यात येणारा हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा साडे दहा फुट उंचीचा असून जमिनीपासून जवळपास तितक्याच उंचीच्या आणि ७ ु ३ या आकाराच्या चौथऱ्यावर उभारण्यात येणार आहे. या उपक्रमाला सर्वतोपरी सहाय्य केले जाईल असे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जाहीर केले होते. कुपवाडा येथील भारतीय सैन्याच्या छावणीत या पुतळ्याच्या स्थानाचे भूमीपूजन भारतीय सेनेच्या राष्ट्रीय रायफल्स च्या ४१ व्या बटालीयनचे (मराठा लाईट इन्फ्रंटरी) कमांडिंग ऑफीसर कर्नल नवलगट्टी आणि छत्रपती शिवाजी स्मारक समितीचे अध्यक्ष अभयराज शिरोळे यांच्या हस्ते दि. २० मार्च २०२३ रोजी पार पडले होते. नवीन तंत्रज्ञानाने बनविलेला छत्रपतींचा हा पुतळा जम्मू काश्मीर मधील प्रतिकूल हवामानात दिर्घकाळ तग धरेल असा बनवला गेला आहे. सदर संस्थेतर्फे कुपवाडा येथे भारतीय सैन्यासोबत विविध दीर्घकालीन उपक्रम प्रस्तावित आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .